मी रशिदाबी इकबाल पिंजारी, वय–५० वर्षे, व्यवसाय– मजुरी, रा. विखरण, ता. शिंदखेडा, जि. धुळे शपथ घेऊन सांगतो की,

**उलटपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. आय. राजपुत यांचेमार्फत–**

१७. मला माझी जन्म तारीख सांगता येणार नाही. मला मराठी वाचता येत नाही. आम्ही दोन बहिणी व तीन भाऊ आहोत. माझ्या एकाचे भावाचे नाव सलीम इब्राहिम पिंजारी असुन दुसऱ्या भावाचे नाव भिकन इब्राहिम पिंजारी असे आहे. तसेच, तिसऱ्या भावाचे नाव छोटु इब्राहिम पिंजारी असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे सासर धुळयामध्ये आहे. दाव्यातील घराचा नंबर ३८५ असा आहे. मला दावा घराचे क्षेत्रफळ सांगता येणार नाही. मला दावा घराच्या चतु:सिमा सांगता येणार नाहीत.

१८. हे म्हणणे खरे आहे की, दावा घराशिवाय विखरणमध्ये दुसरी कोणतीही स्थावर मिळकत नाही. माझ्या वडिलांचे पुर्ण नाव इब्राहिम इस्माईल पिंजारी असे आहे. माझ्या वडिलांच्या निधनाची तारीख मला सांगता येणार नाही. माझ्या वडिलांचे निधन सन २००१ मध्ये झाले. हे म्हणणे खरे नाही की, दावा घर हे माझ्या वडिलांची वडिलोपार्जित मिळकत आहे. सिटी सर्व्हे मध्ये सदर मिळकत माझ्या वडिलांच्या नावे होती. मी दावा मिळकतीचा सिटी सर्व्हेचा उतारा घेतलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या सिटी सर्व्हे रेकॉर्डमध्ये वडिलांच्या मृत्युनंतर वारस म्हणुन नाव लावण्याकरीता मी अर्ज दिलेला नव्हता. सिटी सर्व्हे रेकॉर्डमध्ये सलीम इब्राहिम पिंजारी, भिकन इब्राहिम पिंजारी, छोटु इब्राहिम पिंजारी, सलीमा बी इकबाल पिंजारी, रशीदा बी इकबाल पिंजारी व अमीना बी इब्राहिम पिंजारी अशी नावे लागली असल्याबाबत मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत वडिलोपार्जित नसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही मातीचे धाबे घर आहे.

१९. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईची तब्येत बरोबर राहत नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझे भाऊ हे फिरस्ते धंदेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्याच्या दोन ते अडीच महिन्यापुर्वी माझ्या वादी क्र. २ या भावाने मला सासरहुन बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, तसा निरोप मिळाल्याने मी व माझा मुलगा असे विखरण येथे आलो व तेव्हापासुन मी विखरण येथे राहु लागले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेला जबरदस्ती करुन मी, माझी आई व माझे भाऊ यांना घरातुन बाहेर काढुन दिले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस मी त्यांना शिवीगाळ केली होती व त्यामुळे त्यांनी पोलीस स्टेशन येथे माझ्याविरुध्द तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस मी त्यांना 'तुम्ही जर आईला येथे सोडुन दिले तर मी जाळुन घेईन, पोलीस स्टेशनला तक्रार करेन' अशी धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या धमकीच्या आधारे मी व माझ्या मुलाने सदर घराचा बेकायदेशीर कब्जा करुन घेतलेला आहे.

२०. माझ्या आजोबांचे नाव इस्माईल आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही माझे आजोबा इस्माईल यांची होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल मोलमजुरी करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्न हे माझ्या भावांनी केले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या तिन्ही भावांचे रेशनकार्ड हे विखरणचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती हे धुळे येथे राहतात.

२१. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई अमीनाबी व भाऊ सलीम यांनी मला व माझा मुलगा यांना दावा मिळकत वाटणी होवुन मिळण्याकरीता नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांच्या मृत्युनंतर त्यांच्या चेलम विधीचा सर्व खर्च माझ्या भावांनी केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आई–वडिलांचा सांभाळ मी केला असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही वडिल इब्राहिम पिंजारी यांची स्वंसंपादित मालकीची व ताबे उपभोगातील होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वडिलांचे पालनपोषण हे तिन्ही भावांनी केले नाही व वडिलांचे पालनपोषण मी केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी भांडे घासून

मोलमजुरी करुन विखरण येथे आई-वडिलांचा सांभाळ केला, उदरनिर्वाह केला हे मी जाणुनबूजून खोटे सांगत आहे.

२२. माझ्या वडिलांनी आम्हाला कधी मृत्युपत्र करुन दिले याची तारीख वार मला सांगता येणार नाही. मी मृत्युपत्र हे सिटी सर्व्हे ऑफीसला दिलेले नव्हते. लेखी मृत्युपत्र मी करुन घेतले होते.

२३. आम्हाला नोटीस मिळाल्यानंतर त्या नोटीसीस उत्तर देण्याकरीता मी वकीलांकडे गेले होते. मला त्या वकीलांचे नाव माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, नोटीसीस उत्तर देण्याकरीता गेले असता वकीलांनी मला सांगितले की, तोंडी बक्षीसपत्र आहे असे आपल्याला सांगावे लागेल तर दावा जिंकता येईल. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे वडिलांनी आम्हाला तोंडी बक्षीसपत्र दिले असे उत्तर आम्ही त्या नोटीसीस दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांनी मला सन १९९९ साली दावा मिळकतीचे तोंडी बक्षीसपत्र करुन दिले होते हे मी खोटे सांगत आहे. माझ्या वडिलांनी तोंडी बक्षीसपत्र करुन दिले होते याबाबत त्यांच्या हयातीत मी सिटी सर्व्हे ऑफीस यांच्याकडे कोणताही अर्ज दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सदर तोंडी बक्षीसपत्राच्या आधारे मी त्या घराची मालक आहे व तेव्हापासुन त्या घराचा उपभोग घेत आहे हे मी खोटे सांगत आहे. माझ्या वडिलांनी मला तोंडी बक्षीसपत्र दिले त्यावेळेला माझ्या आत्या वगैरे सगळेच होते. सदर घरावर ७०,०००/- घालुन दुरुस्ती केली मी याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करणार नाही आहे. माझे वडिल मयत इब्राहिम इस्माईल पिंजारी यांचे मृत्युनंतर आई आमीनाबी हिचा सांभाळ मीच करीत होते, सुमारे पाच सहा वर्षांपुर्वी मयत वडिल इब्राहिम इस्माईल पिंजारी यांची शेती होती ती सौर उर्जा प्रकल्पाकरीता विक्री झाली त्यातुन मोठी विक्री झाली, त्यात आई आमीनाबी हिला पण हिस्सा देण्यात आला, वादी व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी मोठया रक्कमा घेतल्या याबाबत माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, या सर्व बाबी मी खोटे कथन करीत आहे.

२४. मी धुळे येथील सासरहुन विखरण येथे कधी आले हे मला आता सांगता येणार

नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा घराचा कब्जा माझ्याकडे १२ वर्षापेक्षा जास्त काळापेक्षा असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांनी मला त्यांच्या हयातीत दावा मिळकत बक्षीस करुन दिले हे मी खोटे सांगत आहे. दि. २८.०९.२०१५ रोजी माझ्या वडिलांच्या मृत्युनंतर सिटी सर्व्हे रेकॉर्डमध्ये माझी व प्रतिवादी यांची वारस म्हणुन नावे लागल्याबाबत मी हरकत घेतलेली नाही. आजपावेतो देखील त्याबाबत मी सिटी सर्व्हे ऑफीस येथे कोणतीही कारवाई केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील मजकुर मी वाचुन पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायत कार्यालयातील ग्रामसेवक याला हाताशी धरुन मी दावा मिळकतीला माझे नाव लावुन घेतलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, पुराव्याच्या शपथपत्रात मराठीत काय लिहिले आहे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावांना वाटणी मिळु नये याकरीता मी कैफियतीमध्ये तोंडी बक्षीसपत्र मिळाल्याचे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2025.07.09 16:00:24 +0530

दिनांक : ०८/०७/२०२५
स्थळ : दोंडाईचा

(आदित्य घ. नाईक)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर,
दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | गणेश साईनाथ अहिरे, |
| न्यायालयाचे नांव | - | दिवाणी न्यायालय क.स्तर, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | - | ०९.०७.२०२५ |

स्वाक्षरित/-
लघुलेखक (श्रेणी-३)